सत्यप्रभा दि. 13/01/2023

# चोरीच्या गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक

## १ लाखाचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड/प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दि.१२ रोजी टायरबोर्ड येथे सापळा रचून दोन आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून ३ मोबाईल, १ मोटारसायकल असा एकूण १ लाख रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शहरात स्थानिक गुन्हे शाखेकडून सराईत गुन्हेगारांच्या विरोधात धडक मोहिम राबविली आहे. कालच एका बनावट गोळीबार प्रकरणातील दोन आरोपींना ताब्यात घेवून त्यांच्याकडून १ पिस्टल जप्त करण्यात आली होती. यानंतर मोबाईल चोरी प्रकरणातील आरोपींची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना खबऱ्या मार्फत मिळाली. सदरील माहिती पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांना देवून चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बिर्याणी हाऊस पिरबुऱ्हान नगर येथे मोबाईल चोरी प्रकरणातील एका आरोपीस टायरबोर्ड भागात सापळा रचून ताब्यात घेतले. आरोपी शेख आमेर शेख अखिल वय २३ वर्षे, रा.जुना मुजामपेठ नांदेड याची चौकशी करून त्याचा साथीदार माधव अशोक खंडागळे सम्राट अशोकनगर नांदेड दोघांनी मिळून रॉयल बिर्याणी हाऊस येथून दोन मोबाईल चोरी केल्याचे सांगितले. दोन्ही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेवून त्यांच्याकडून ३ मोबाईल व गुन्ह्यात वापरलेली एक मोटारसायकल असा एकूण १ लाख रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना पुढील तपासासाठी भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या आरोपींकडून चोरी व चोरी प्रकरणातील आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे. सदरील कारवाई पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलीस अधिक्षक अविनाशकुमार, खंडेराय धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, पोउपनि दत्तात्रय काळे, पोना बालाजी तेलंग, पोकॉ विलास कदम, गणेश धुमाळ, मारोती मोरे, महेश बडगु, शंकर केंद्रे, दिपक ओढणे, राजू सिटीकर यांच्या पथकाने पार पाडली. दरम्यान नांदेड शहरामध्ये वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडून प्रयत्न केले जात आहे. पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अनेक गुन्हेगारांच्या मुस्क्या आवळून त्यांना जेलची हवा खावू घातली आहे.